तात्काळ/महत्वाचे
कालमर्यादा/शुध्दीपत्रक

जा.क्र.शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१५
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक:- 29 SEP 2015

प्रति
अध्यक्ष/सचिव,
मावळ शिक्षण प्रतिष्ठान तळेगांव दाभाडे ता.मावळ जि. पुणे

विषय - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता दुरुस्ती प्रस्तावाबाबत

संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४)-२०१२.
२. शासन निर्णय क्र. स्वयंअ-२०१३/(८५/१३)माशि-१ दि. ०५ ऑक्टोबर २०१३.
३. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/१३/३१२०९/१० दि. ०२.१२.२०१३
४. शासन निर्णय एसएफएस-२०१५/प्र.क्र.१०५/एसएम-२ दिनांक १९.०८.२०१५

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियपन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०२ च्या शासन निर्णयानुसार या कार्यालयाचे संदर्भ क्र-३ च्या पत्रान्वये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता अटी व शर्तीवर परवानगी दिलेली होती. परंतु शासन निर्णय संदर्भ क्र-४ अन्वये सदर शाळेच्या प्रकारात दुरुस्तीस खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन परवानगी देण्यात येत आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ | मान्यता वर्ग/ इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ८ | पुणे | मावळ शिक्षण प्रतिष्ठान तळेगांव दाभाडे ता.मावळ जि. पुणे | प्रतिक विद्यानिकेतन निगडे, ता. मावळ जि. पुणे (उच्च प्राथमिक) | मराठी | नवीन शाळा | उच्च प्राथमिक | २०१३-१४ |

अटी व शर्ती :-

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे,त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून असेल.
४. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.
५. परवानगी मिळालेपासून १८ (अठरा) महिन्यांच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी आपोआप रद्दबातल ठरेल.
६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन )मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
७. शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी प्राप्त शाळांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन व्यवस्थापनाने शाळा मान्यतेकरिता माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ०३ परिशिष्ठ ०२ मधील विहित नमुन्यात एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेचा प्रस्ताव सक्षम अधिका-यांकडे सादर करणे आवश्यक राहील.
१० सीबीएसई,आयसीएसई,आयबी,आयजीएसई,आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास /शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दिनांक २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील.शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविणेसाठी शासनास अर्ज करेल.
११ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना U-DISE मध्ये माहिती भरतांना स्वयंअर्थसहाय्यित शाळा / वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यकराहील.
१२ शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक राहील.
१३ या कार्यालयाचे दिनांक ०२.१२.२०१३ व आदेश रद्द समजण्यात यावेत.

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,
१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे
प्रत माहितीसाठी :-
१ मा उप सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मंबई

Head Master
Pratik Vidya Niketan
Nigde, Tal. : Maval, Pune

मुख्याध्यापक
प्रतिक विद्या निकेतन
निगडे, ता. मावळ जि. पुणे

Scanned with CamScanner